**बी. ए. भाग 1 सेमिस्टर II**

**भारतीय अर्थव्यवस्था पेपर II**

**सराव प्रश्नपत्रिका**

**प्रा. डॉ. प्रशांत फडणीस (M.A., SET, Ph.D.)**

**अर्थशास्त्र विभाग प्रमुख,**

**बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण**

---

1) अलीकडच्या काळात देशातील स्थूल देशांतर्गत उत्पादनात शेतीचा हिस्सा घटत आहे.
2) आजही भारतीय अर्थव्यवस्थेत एकूण रोजगार पैकी शेती व्यवसायात रोजगाराचे प्रमाण 48.9 प्रतिशत आहे.
3) आर्थिक सुधारणा नंतरच्या कालावधीत शेतीतील सरकारी गुंतवणूकित घट होत आहे
4) भारतात 2011 मध्ये एकूण लोकसंख्येपैकी 54.6 प्रतिशत लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतलेली होती
5) शेती उत्पादनासाठी लागणारे घटक व शेतीतील उत्पादन यांच्या प्रमाणाला शेतीची उत्पादकता असे म्हणतात.
6) शेती उत्पादकतेचे भूमी उत्पादकता आणि श्रम उत्पादकता हे दोन मुख्य प्रकार आहेत
7) विकसित देशांची तुलना करता भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे.
8) स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेतीत कायदे जमिनदारी चे उच्चाटन कमाल जमीन धारणा कायदा इत्यादी सुधारणा करण्यात आल्या.
9) कृषी उत्पादन वाढविण्यासाठी संकरित बियाणांचा वापर, खतांचा वापर, कीटकनाशकांचा वापर इत्यादी प्रयोग करण्यात आले.
10) भारतीय शेतीची उत्पादकता लोकसंख्येचा वाढता भार, शेतजमिनीचे लहान आकारमान, परंपरागत शेती या घटकांमुळे कमी आहे.
11) भारतात शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक उत्पादन तंत्र, रासायनिक खतांचा वापर, सिंचन सुविधेत वाढ इत्यादी सुधारणा करण्यात आल्या.
12) शेती करण्याच्या आधुनिक नव्या तंत्रज्ञानाची मिळत्याजुळत्या नसणाऱ्या परंपरागत पद्धतीचा त्याग करणे व आधुनिक पद्धतीचा व तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे व शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे म्हणजे हरितक्रांती होय.
13) भारतात चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात हरितक्रांती घडून आली.
14) भारतीय शेतकऱ्यांसाठी दुसऱ्या हरित क्रांतीची हाक डॉक्टर मनमोहन सिंग यांनी दिली.
15) भारतीय हरितक्रांतीचे जनक म्हणून डॉक्टर एम एस स्वामीनाथन यांना ओळखले जाते.
16) 2004 मध्ये भारतात राष्ट्रीय शेतकरी आयोगाने ची स्थापना करण्यात आली त्याचे अध्यक्ष डॉक्टर एम एस स्वामीनाथन होते.
17) हरित क्रांतीची प्रमुख वैशिष्ट्ये उच्च पैदास बियाणांचा वापर रासायनिक खतांचा वापर शेतीविषयक संशोधनाला चालना शेतीचे यांत्रिकीकरण इत्यादी सांगता येतील
18) हरितक्रांतीच्या अनुकूल परिणाम मध्ये अन्नधान्य बाबत स्वावलंबन रोजगारात वाढ शेती उत्पादनात वाढ इत्यादी सांगता येतील.
19) हरितक्रांतीच्या प्रतिकूल परिणाम मध्ये जमीनदारांना लाभ शेती उत्पन्नात विषमता जमीन सुधारणांकडे दुर्लक्ष ठराविक पिके व प्रदेशातच हरितक्रांती इत्यादी सांगता येतील.
20) नाफेड ची स्थापना 1958 मध्ये करण्यात आली.
21) कृषी खर्च आणि व्यय आयोगाची स्थापना 1965 मध्ये करण्यात आली.
22) भारतात अन्न महामंडळाची स्थापना 1 जानेवारी 1965 रोजी करण्यात आली.
23) भारतात शेतमालाच्या किमतीतील चढ-उतार यांची प्रामुख्याने निसर्गावरील अवलंबित्व विपणन दोष नैसर्गिक आपत्ती सौदाशक्ती इत्यादी कारणे सांगता येतील.

24) भारतात औद्योगिकरणाची गरज नैसर्गिक संसाधनांचा वापर बेरोजगारीचा प्रश्न सोडविणे राष्ट्रीय उत्पन्न वाढ आर्थिक विकास प्रादेशिक असमतोल दूर करणे यासाठी व्यक्त केली जाते.

25) विविध उत्पादन फल व बदल घडविणारी प्रक्रिया म्हणजे औद्योगिकरण होय.

26) भारतातील बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी देशात जलद औद्योगिकरणाच्या आवश्यकता आहे.

27) सापेक्ष तेने शेतीपेक्षा औद्योगिक क्षेत्रात उत्पादकता जास्त असते.

28) ॲडम स्मिथच्या मते देशाच्या संपन्न त्यापेक्षा संरक्षण महत्त्वाचे आहे.

29) नवीन आर्थिक किंवा औद्योगिक धोरण 24 जुलै 1991 रोजी जाहीर करण्यात आले.

30) नवीन औद्योगिक धोरणात खासगीकरण उदारीकरण व जागतिकीकरणाच्या चालना देण्यात आली.

31) 1991 च्या औद्योगिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे उद्योगांची स्पर्धात्मकता वाढविणे आर्थिक वृद्धी विभागीय असमतोल दूर करणे जागतिकीकरणाची जोडणे ही होती.

32) नवीन औद्योगिक धोरणानुसार विदेशी गुंतवणूकदारांना 51 टक्के भागभांडवलात सहभागी होण्याची तरतूद होती.

33) वित्त आयोगानुसार लघु उद्योग म्हणजे ज्यामध्ये वेतनावर काम करणारे दहा ते पन्नास श्रमिक असतात उद्योगात पाच लाख रुपयांपेक्षा कमी भांडवल गुंतवले जाते असे उद्योग होय.

34) जे उद्योग पूर्णत अगर अंशतः कुटुंबातील व्यक्तींच्या मदतीने चालविली जातात त्यांना कुटीर उद्योग असे म्हणतात.

35) राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाची स्थापना 1955 मध्ये झाली.

36) भारतीय लघुउद्योग विकास बँक सिडबी 1990 मध्ये स्थापन झाली.

37) भारतात लघु व कुठे उद्योगांना कच्च्या मालाची समस्या भांडवलाची समस्या विपणनाचे समस्या व जुने उत्पादन तंत्र या होत्या.

38) 1977 च्या औद्योगिक धोरणाने जिल्हा औद्योगिक केंद्र ही संकल्पना स्वीकारण्यात आली.

39) देशात गुंतवणुकीच्या उद्देशाने देशाच्या भौगोलिक सीमारेषेबाहेर देशातून येणारी भांडवल म्हणजे विदेशी भांडवल होय.

40) विदेशी गुंतवणूक म्हणजे विदेशी व्यक्ती व संस्थांनी दुसऱ्या देशांमध्ये केलेली प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भांडवली गुंतवणूक होय.

41) 1991 नंतर मुक्त गुंतवणुकीचे धोरण स्वीकारले गेले.

42) भारतात विमा क्षेत्रात शंभर टक्के विदेशी गुंतवणुकीस मुभा आहे.

43) भारतात विदेशी संस्थात्मक गुंतवणूक संरक्षण क्षेत्रात पूर्णपणे निषिद्ध आहे.

44) व्यवसायानुसार प्राथमिक क्षेत्र द्वितीय क्षेत्र व तृतीय क्षेत्र असे प्रकार केले जातात.

45) भारतातील सेवा क्षेत्राची रचना अभ्यासताना राज्यघटनेनुसार केंद्र सूची राज्य सूची व मध्यवर्ती सूची असे तीन प्रकारांत वर्गीकरण केले आहे.

46) दळणवळण व दूरसंचार क्षेत्रात सर्वाधिक प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आहे.

47) 2015-16 मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात सेवा क्षेत्राचा हिस्सा 53.2% होता.

48) राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा हिस्सा विचारात घेता भारताचा जगात दहावा क्रमांक लागतो.

49) भारत सेवांच्या आयात निर्यातीत जगात आठव्या क्रमांकावर आहे.

50) ब्रिटिश सरकारने 1935 मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना केली.

51) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण 1949 मध्ये झाले.

52) 1955 मध्ये इम्पिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली.

53) 1969 मध्ये चौदा मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले.

54) 1948 मध्ये भारतीय औद्योगिक वित्तपुरवठा महामंडळाची स्थापना करण्यात आली.

55) 1955 मध्ये भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळाची स्थापना झाली.

56) 1964 मध्ये भारतीय औद्योगिक विकास बँक स्थापन करण्यात आली.

57) 1990 मध्ये भारताची लघु उद्योग विकास बँक सिडबी ची स्थापना करण्यात आली.

58) 1982 मध्ये आयात निर्यात बँक स्थापन झाली.

59) 1956 मध्ये देशात आयुर्विमा व्यवसाय करणार्या 245 खाजगी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करून भारतीय आयुर्विमा महामंडळाची स्थापना करण्यात आली.

60) भारत सरकारने 1971 मध्ये सर्वसाधारण विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केले.

61) बँका लोकांना बचतीची सवय लावतात.

62) अग्रक्रम क्षेत्रात लहान शेतकरी लघू उद्योग कुटीर उद्योगांचा समावेश होतो.

63) सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी स्वयंरोजगार योजना आखण्यात आली.

64) मोठय़ा औद्योगिक ग्रहांना बँकांचा कर्जपुरवठा उपलब्ध होतो.

65) विमा महामंडळ उद्योग गृहनिर्माण वीजनिर्मितीमध्ये गुंतवणूक करते.

66) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामुळे भारताचे जगात ज्ञानशक्तीच्या केंद्र अशी प्रतिमा तयार झाली आहे.

67) इंटरनेटचा सर्वाधिक वापरामध्ये चीननंतर जगात भारताचा दुसरा क्रमांक आहे तर अमेरिकेचा तिसरा क्रमांक आहे.

68) अलीकडच्या काळात माहिती तंत्रज्ञानाचा वापर सरकारी कार्यालये सार्वजनिक क्षेत्र शाळा महाविद्यालयांमध्ये वाढला आहे.

69) 2011-12 यामध्ये एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात आयटी क्षेत्राचा हिस्सा 7.5% होता.

70) नॅसकॉम ही माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावर काम करणारी संस्था आहे.

71) वाहतूक व दळणवळण व्यवसायाला मानवी शरीरातील रक्तवाहिन्यांचे उपमा दिली आहे.

72) भारतातील पहिला रेल्वेमार्ग ब्रिटिश राजवटीत 1853 मध्ये मुंबई ते ठाणे 22 किमी या दोन ठिकाणांना जोडणारा होता.

73) आशिया खंडात भारतीय रेल्वे प्रथम क्रमांकावर असून जगात भारतीय रेल्वेचा चौथा क्रमांक लागतो.

74) 1953 मध्ये विमान वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करून हवाई वाहतूक महामंडळ स्थापन केले.

75) 1961 मध्ये भारतीय जहाज वाहतूक महामंडळाची स्थापना करण्यात आली.

76) 1837 साली भारतात टपाल सेवेची सुरुवात झाली.

77) रस्ते वाहतूक हा व्यवसाय श्रमप्रधान आहे.

78) रेल्वे वाहतूक हा व्यवसाय भांडवलप्रधान आहे.

79) भारतात जवळजवळ सहा लाख खेडी आहेत.

80) शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ही सर्वात मोठी संस्था सरकारी क्षेत्रात आहे.

81) माणसाने त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणाहून इतरत्र केलेले अल्पकालीन स्थलांतर म्हणजे पर्यटन होय.

82) 1958 मध्ये भारत सरकारने स्वतंत्र पर्यटन मंत्रालयाची स्थापना केली.

83) 1966 मध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना झाली.

84) पर्यटन हा आधुनिक व्यवसाय आहे.

85) पर्यटनासाठी मोटार रेल्वे विमान इत्यादींचा वापर केला जातो.

86) पर्यटनाचा हेतू संशोधन व्यवसाय मनोरंजन हा असू शकतो.

87) भारतात प्राकृतिकदृष्ट्या भिन्नता आहे.

88) भारताच्या एकूण रोजगारीत पर्यटन उद्योगातील रोजगाराच्या हिस्सा आठ टक्के आहे.

89) पर्यटन उद्योगांचा विकास होणार्या राष्ट्रात भारताचा जगात पाचवा क्रमांक लागतो.

90) भारतातील पर्यटन उद्योगामुळे नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होते.

91) पर्यटन उद्योगांमुळे भारताला बहुमोल असे परकीय चलन मिळते.

प्रश्न 2. टिप लिहा

1) शेती उत्पादकता
2) दुसरी हरित क्रांती
3) हरित क्रांती चे अपयश
4) सेवा क्षेत्राचे महत्व
5) वाहतूक व दळणवळण
6) NBFC
7) 1991 चे औद्योगिक धोरण
8) खाजगीकरण संकल्पना
9) जागतिकीकरण संकल्पना
10) हरित क्रांती चे यश
11) लघु व कुटीर उध्योगा चे प्रकार
12) माहिती तंत्रादन

1) हरित क्रांती चे यश अपयश स्पष्ट करा.
2) खाजगीकरण संकल्पनेचे भारतीय अर्थ व्यवस्थेमधील महत्व स्पष्ट करा.
3) वाहतूक व दळणवळणाचे भारतीय अर्थ व्यवस्थेमधील महत्व स्पष्ट करा.
4) लघु व कुटीर उद्योगासामोरील समस्या स्पष्ट करा.
5) सेवा क्षेत्राचे भारतीय अर्थ व्यवस्थेमधील महत्व स्पष्ट करा.
6) पर्यटन क्षेत्राचे भारतीय अर्थ व्यवस्थेमधील महत्व स्पष्ट करा.
7) माहिती तंत्रादन उद्योगाचे भारतीय अर्थ व्यवस्थेमधील महत्व स्पष्ट करा.
8) भारतीय अर्थ व्यवस्थेमधील औद्योगिकरणाची गरज स्पष्ट करा.